सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६**

# महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९

(दिनांक ३ नोव्हेंबर, २००६ पर्यंत सुधारित)

# Maharashtra Act No. XVI of 2000
# The Maharashtra Protection of Interest of Depositors (in Financial Establishments) Act, 1999

(As modified upto 3rd November 2006)

व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[ किंमत रु. ५/– ]

# महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव व प्रारंभ. ... ... ... | १ |
| २. | व्याख्या. ... ... ... | २ |
| ३. | वित्तीय संस्थेने केलेली कपटपूर्ण कसूर. ... ... ... | ३ |
| ४. | ठेवी परत करण्यात कसूर केल्यास मालमत्ता जप्त करणे. ... ... | ४ |
| ५. | सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक. ... ... ... | ४ |
| ६. | विशेषित न्यायालय. ... ... ... | ५ |
| ७. | जप्तीविषयीचे विशेषित न्यायालयाचे अधिकार. ... ... ... | ५ |
| ८. | असद्भावी हस्तांतरितीची मालमत्ता जप्त करणे. ... ... ... | ६ |
| ९. | जप्तीऐवजी प्रतिभूती देणे. ... ... ... | ७ |
| १०. | जप्त केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन. ... ... ... | ७ |
| ११. | अपील. ... ... ... | ७ |
| १२. | विशेष सरकारी अभियोक्ता. ... ... ... | ७ |
| १३. | अपराधांच्या बाबतीत विशेषित न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार. ... | ७ |
| १४. | अधिनियम अन्य कायद्यावर अधिभावी ठरणे. ... ... ... | ७ |
| १५. | सद्भावपूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण. ... ... ... | ८ |
| १६. | नियम करण्याचा अधिकार. ... ... ... | ८ |
| १७. | अडचणी दूर करण्याचा अधिकार. ... ... ... | ८ |
| १८. | सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४ चे निरसन व व्यावृत्ती. ... | ८ |

# सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६

## महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९

[२१ जानेवारी, २०००]

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २१ जानेवारी २००० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम)

**वित्तीय संस्थांच्या ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी अधिनियम.**

१९९९ चा महा. अध्या. ३४. **ज्याअर्थी,** महाराष्ट्राच्या राज्यपालांनी दिनांक २९ एप्रिल १९९९ रोजी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अध्यादेश, १९९९ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अध्यादेश" असा करण्यात आला आहे) प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** दिनांक २२ ऑक्टोबर १९९९ रोजी राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्यानंतर, राज्य विधानमंडळाची सत्र समाप्ती दिनांक २३ ऑक्टोबर १९९९ रोजी झाल्यामुळे उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणारे विधेयक महाराष्ट्र विधानसभेत वेळेअभावी प्रस्तुत करता आले नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२) (क) द्वारे, तरतूद केल्याप्रमाणे उक्त अध्यादेश राज्य विधानमंडळाची पुन्हा सभा भरल्याच्या दिनांकापासून ज्या दिनांकास सहा आठवड्यांचा कालावधी संपतो, त्या ३ डिसेंबर १९९९ या दिनांकानंतर जारी असण्याचे बंद झाले असते;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाच्या तरतुदी कायद्याद्वारे जारी असण्याचे चालू ठेवणे इष्ट आहे असे वाटले होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी उक्त अध्यादेशाच्या तरतुदी जारी असण्याचे चालू ठेवण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून उक्त अध्यादेश मागे घेऊन
१९९९ चा महा. अध्या. ३४. त्याचे निरसन करण्यात आले होते आणि दिनांक २ डिसेंबर १९९९ रोजी महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९, हा भूतलक्षी प्रभावाने, म्हणजेच दिनांक २९ एप्रिल १९९९ पासून प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) च्या परंतुकान्वये राष्ट्रपतींकडून अनुदेश प्राप्त झाले आहेत;

१९९९ चा महा. अध्या. ३४. **आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ याचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :---

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो दिनांक २९ एप्रिल १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,---

(क) ''सक्षम प्राधिकारी'' याचा अर्थ, कलम ५ अन्वये नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, असा आहे;

(ख) ''विशेषित न्यायालय'' याचा अर्थ, कलम ६ अन्वये प्रस्थापित करण्यात आलेले विशेषित न्यायालय, असा आहे;

(ग) ''ठेव'' या शब्दप्रयोगामध्ये, कोणत्याही वित्तीय संस्थने, व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील कोणत्याही लाभासह किंवा त्याशिवाय एका विनिर्दिष्ट मुदतीनंतर किंवा अन्यथा, रोख रकमेच्या किंवा वस्तूच्या स्वरूपात किंवा एखाद्या विनिर्दिष्ट सेवेच्या स्वरूपात परत करण्यात यावयाचा घेतलेला कोणताही पैसा किंवा स्वीकारलेली कोणतीही मौल्यवान वस्तु यांचा समावेश होतो आणि त्यांचा नेहमीच तसा समावेश असल्याचे मानण्यात येईल; परंतु, यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश नसेल :---

(एक) भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळ अधिनियम, १९९२ या अन्वये स्थापन करण्यात आलेल्या भारतीय प्रतिभूती आणि विनियम मंडळाने (सेबी) घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आणि केलेले विनियम यांच्या कक्षेत येणाऱ्या भाग-भांडवलाद्वारे किंवा ऋणपत्र, रोखा किंवा कोणताही अन्य संलेख याद्वारे उभारलेली रक्कम; १९९२ चा १५.

(दोन) एखाद्या भागीदारी संस्थेच्या भागीदारांनी भांडवल म्हणून दिलेल्या रकमा;

(तीन) अनुसूचित बँक किंवा सहकारी बँक किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५, खंड (ग) यामध्ये व्याख्या केलेली कोणतीही अन्य बँक व्यवसाय कंपनी यांच्याकडून प्राप्त झालेल्या रकमा; १९४९ चा १०.

(चार) (क) भारतीय औद्योगिक विकास बँक;

(ख) राज्य वित्तीय महामंडळ;

(ग) भारतीय औद्योगिक विकास बँक अधिनियम, १९६४ याच्या कलम ६-क मध्ये किंवा त्या अन्वये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही वित्तीय संस्था; किंवा १९६४ चा १८.

(घ) या बाबतीत शासन विनिर्दिष्ट करील अशी अन्य कोणतीही संस्था, यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम;

(पाच) सध्याच्या सर्वसाधारण ओघांत,---

(क) प्रतिभूती ठेव,

(ख) डिलरशिप ठेव,

(ग) इसाऱ्याची रक्कम,

(घ) माल किंवा सेवा यांच्या नोंदवण्यात आलेल्या मागणीसंबंधात आगाऊ दिलेली रक्कम, या स्वरूपात प्राप्त झालेल्या रकमा;

(सहा) राज्यात त्या वेळी अंमलात असलेल्या, सावकारी व्यवसायाशी संबंधित एखाद्या अधिनियमाखाली नोंदणी करण्यात आलेली एखादी व्यक्ती किंवा निगम निकाय नसलेली एखादी व्यवसाय संस्था किंवा व्यक्तींचा संघ यांच्याकडून प्राप्त झालेली कोणतीही रक्कम; आणि

(सात) चिट-फंडाच्या बाबतीत वर्गणीच्या मार्गाने प्राप्त झालेली कोणतीही रक्कम.

१९८२ चा ४०. **स्पष्टीकरण एक.**—"चिट-फंड" या शब्दप्रयोगाला, चिट-फंड अधिनियम, १९८२ याच्या कलम २, खंड (ख) मध्ये नेमून दिलेला अर्थ असेल ;

**स्पष्टीकरण दोन.**—एखाद्या मालमत्तेच्या (जंगम किंवा स्थावर) विक्रीवर, विक्रेत्याने खरेदीदाराला दिलेली पतउधारी (क्रेडिट), ही या खंडाच्या प्रयोजनार्थ ठेव म्हणून मानण्यात येणार नाही ;

(घ) "वित्तीय संस्था" याचा अर्थ, कोणतीही योजना किंवा व्यवस्था या अन्वये किंवा कोणत्याही अन्य रीतीने, ठेवी स्वीकारणारी कोणतीही व्यक्ती, असा आहे, परंतु त्यात राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या मालकीच्या किंवा त्याचे नियंत्रण असलेल्या महामंडळाचा १९४९ चा १०. किंवा सहकारी संस्थेचा किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम ५, खंड (ग) अन्वये केलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या बँक व्यवसाय कंपनीचा समावेश होत नाही ;

(ङ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन.

**वित्तीय संस्थेने केलेली कपटपूर्ण कसूर.**

**३.** जिने अभिवचन दिल्याप्रमाणे मुदत संपल्यानंतर व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील कोणत्याही लाभांसह ठेवीची कोणतीही परतफेड करण्यास कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल किंवा आश्वासन दिल्याप्रमाणे ठेवीच्या बदल्यात सेवा देण्यास कपटपूर्ण रीतीने कसूर केली असेल अशा कोणत्याही वित्तीय संस्थेस, अशा वित्तीय संस्थेच्या व्यवस्थापनास किंवा तिचा धंदा अथवा कामकाज चालविण्यास जबाबदार असलेल्या प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक किंवा कोणतीही अन्य व्यक्ती किंवा कर्मचारी यांसह, प्रत्येक व्यक्तीस, अपराधसिद्धीनंतर सहा वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची आणि एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा देण्यात येईल आणि अशी वित्तीय संस्थादेखील एक लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, ज्या वित्तीय संस्थेने अभिवचन दिल्याप्रमाणे व्याज, लाभांश, फायदा यांच्या स्वरूपातील किंवा कोणत्याही अन्य स्वरूपातील अशा लाभांसह अशा ठेवीची परतफेड करण्यात कसूर केली असेल किंवा अशा ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विनिर्दिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा एखाद्या व्यक्तीला अन्याय्य लाभ देण्याच्या हेतूने किंवा अन्य एखाद्या व्यक्तीची अन्याय्य हानी करण्याच्या हेतूने, ठेवीच्या बदल्यात कबूल केलेली कोणतीही विशिष्ट सेवा देण्यास कसूर केली असेल किंवा अशी ठेव स्वीकारताना दिलेल्या अव्यवहार्य किंवा व्यापारी दृष्ट्या व्यवहार्य नसलेल्या अभिवचनांमधून उद्भवणाऱ्या किंवा अशा ठेवीमधून संपादन करण्यात आलेला पैसा किंवा मत्ता, आवश्यक तेव्हा त्या परत मिळविण्यात ज्यामध्ये अंगभूत जोखीम अंतर्भूत असेल अशा रीतीने उपयोगात आणल्यामुळे उद्भवणाऱ्या तिच्या असमर्थतेमुळे, अशी कसूर केली असेल त्या वित्तीय संस्थेने कपटपूर्ण रीतीने अशी कसूर केली असल्याचे किंवा विशिष्ट सेवा देण्यात कसूर केली असल्याचे मानण्यात येईल.

ठेवी परत करण्यात कसूर केल्यास मालमत्ता जप्त करणे.

४. (१) त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,–

(एक) ठेवीदारांकडून तक्रारी प्राप्त झाल्यावर किंवा अन्यथा शासनाची अशी खात्री पटली असेल की, कोणत्याही वित्तीय संस्थेने,—

(क) मुदत संपल्यानंतर किंवा ठेवीदारांनी मागणी केल्यावर ठेव परत करण्यात, किंवा

(ख) व्याज किंवा आश्वासन दिलेला इतर लाभ देण्यात; किंवा

(ग) अशा ठेवीच्या बदल्यात देण्याचे अभिवचन दिलेली सेवा पुरविण्यात कसूर करीत आहे तर त्या बाबतीत; किंवा

(दोन) कोणतीही वित्तीय संस्था ठेवीदारांची फसवणूक करण्याच्या इराद्याने त्यांच्या हितसंबंधास हानिकारक ठरेल अशा रीतीने बुद्धिपुरस्सरपणे काम करीत आहे असे शासनाला सकारण वाटत असेल; तर त्या बाबतीत—

आणि अशी वित्तीय संस्था ठेवी परत करण्याची किंवा आश्वासन दिलेले व्याज किंवा इतर लाभ देण्याचा किंवा ज्यांच्या बदल्यात ज्या ठेवी स्वीकारण्यात आल्या त्या सेवा पुरविण्याची शक्यता नाही अशी शासनाची खात्री पटली असेल तर, शासनास, अशा वित्तीय संस्थांमधील ठेवीदारांच्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी, त्यांची कारणे लेखी नमूद केल्यानंतर, अशा वित्तीय संस्थेने गोळा केलेल्या ठेवींमधून स्वतःच्या नावाने किंवा कोणत्याही अन्य व्यक्तीच्या नावाने संपादन केला असल्याचा मानण्यात येणारा पैसा किंवा अन्य मालमत्ता किंवा असा पैसा किंवा अन्य मालमत्ता जप्तीसाठी उपलब्ध नाही किंवा ठेवीची परतफेड करण्यासाठी पुरेशी नाही असे त्यास दिसून आले तर, उक्त वित्तीय संस्थेची किंवा तिचा प्रवर्तक, संचालक, भागीदार किंवा व्यवस्थापक किंवा सदस्य यांची शासनाला योग्य वाटेल अशी अन्य मालमत्ता जप्त करण्याचा आदेश, तो आदेश **राजपत्रात** प्रसिद्ध करून देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश प्रसिद्ध झाल्यावर, त्यामध्ये निर्देशिलेली वित्तीय संस्था आणि व्यक्ती यांच्या सर्व मालमत्ता आणि मत्ता, विशेषित न्यायालयाकडून पुढील आदेश होईपर्यंत शासनाने नियुक्त केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे ताबडतोब निहित होतील.

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (१) अन्वये त्याच्या जिल्ह्यातील तक्रारी स्वीकारण्यास सक्षम असेल आणि तो त्या त्याच्या अहवालासोबत लवकरात लवकर शासनाकडे पाठवील आणि तक्रारीची एक प्रत यथास्थिति, संबंधित जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा पोलीस आयुक्त यांच्याकडे देखील तपासासाठी पाठवील.

सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक.

५. (१) शासनास कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये आदेश देताना, त्याने कलम ४ अन्वये जप्ती आणलेल्या वित्तीय संस्थेच्या पैशावर व मालमत्तेवर नियंत्रण ठेवण्याकरिता, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्याची, सक्षम प्राधिकारी म्हणून नेमणूक करता येईल.

(२) सक्षम प्राधिकाऱ्यास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, आवश्यक असतील असे इतर अधिकार असतील.

(३) सक्षम प्राधिकारी उक्त आदेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, कलम ४ अन्वये ज्या कारणांच्या आधारे उक्त आदेश दिलेला आहे ती कारणे आणि ठेवीमधून

संपादन केला असल्याचे वाटत असेल असा पैसा किंवा इतर मालमत्ता, आणि ज्या व्यक्तीच्या नावे अशा मालमत्तेत गुंतवणूक केली असल्याचे किंवा ती संपादित केली असल्याचे समजले जात असेल त्या व्यक्तींचा; किंवा कलम ४ अन्वये जप्त करण्यात आलेल्या कोणत्याही इतर मालमत्तेचा; कोणताही असल्यास, तपशील नमूद करणाऱ्या एका किंवा अधिक शपथपत्रांसह आवश्यक वाटतील अशा पुढील आदेशासाठी विशेषित न्यायालयाकडे अर्ज करील.

६. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, शासनास, मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या सहमतीने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक क्षेत्रांसाठी किंवा अशा प्रकरणासाठी किंवा प्रकरणांच्या वर्गासाठी किंवा गटासाठी, जिल्हा व सत्र न्यायाधीशांच्या संवर्गामध्ये एका किंवा अधिक विशेषित न्यायालयांची प्रस्थापना करता येईल. विशेषित न्यायालय.

१९०९ चा ३. (२) विशेषित न्यायालय वगळता इलाखा शहर दिवाळखोरी अधिनियम, १९०९ आणि प्रांतीय
१९२० चा ५. दिवाळखोरी अधिनियम, १९२० या अन्वये प्रस्थापित करण्यात आलेल्या न्यायालयासह अन्य कोणत्याही न्यायालयाला ज्या कोणत्याही प्रकरणास या अधिनियमाच्या तरतुदी लागू होत असतील त्याबाबत अधिकारिता असणार नाही.

(३) या अधिनियमाच्या तरतुदी लागू असलेले कोणतेही प्रकरण अन्य कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असेल तर, ते, हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकाला विशेषित न्यायालयाकडे हस्तांतरित होईल.

७. (१) कलम ५ अन्वये अर्ज आल्यानंतर विशेषित न्यायालय, कलम ४ अन्वये शासनाने जिची मालमत्ता जप्त करून सक्षम प्राधिकाऱ्याकडे निहित केली असेल अशा वित्तीय संस्थेस किंवा अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, अर्ज आणि शपथपत्रे व नोंदविण्यात आलेले कोणतेही पुरावे असल्यास, ते पुरावे यांसह नोटीस पाठवील आणि अशा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या दिनांकाला हजर राहून जप्तीचा आदेश का कायम करू नये याची कारणे दाखविण्यास उक्त संस्थेस व उक्त व्यक्तींस फर्मावील. जप्तीविषयीचे विशेषित न्यायालयाचे अधिकार.

(२) त्याचप्रमाणे विशेषित न्यायालय कलम (१) अन्वये ज्यांना अशी नोटीस पाठविण्यात आलेली असेल अशा वित्तीय संस्थेच्या किंवा व्यक्तीच्या मालमत्तेमध्ये ज्यांचा कोणताही हितसंबंध किंवा हक्क आहे किंवा ते तसा दावा करण्याची शक्यता आहे, असे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल, अशा इतर सर्व व्यक्तींना देखील नोटीस पाठवील आणि त्यांना नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या त्याच दिनांकास उपस्थित राहण्यास आणि मालमत्तेमध्ये किंवा मालमत्तेच्या भागामध्ये त्यांचा हितसंबंध असल्याच्या कारणावरून त्यांची तशी इच्छा असल्यास जप्तीस आक्षेप घेण्यास फर्मावील.

(३) जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये किंवा तिच्या भागामध्ये हितसंबंधाचा दावा करणारी कोणतीही व्यक्ती तिला या कलमाखाली कोणतीही नोटीस देण्यात आलेली नसली तरी, पोट-कलम (४) किंवा पोट-कलम (६) अन्वये कोणताही आदेश निघण्यापूर्वी कोणत्याही वेळी विशेषित न्यायालयामध्ये पूर्वी म्हटल्याप्रमाणे आक्षेप घेऊ शकेल.

(४) जर पोट-कलम (३) अन्वये विनिर्दिष्ट दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी कोणतेही कारण देण्यात आले नाही किंवा कोणतेही आक्षेप घेण्यात आले नाही तर, विशेषित न्यायालय, जप्तीचा आदेश कायम करणारा आदेश ताबडतोब देईल आणि जप्त केलेल्या मत्तेच्या वसुलीसाठी व जप्त

करण्यात आलेल्या मालमत्तेमधून वसूल झालेल्या रकमेच्या समन्याय वाटपाकरिता आवश्यक असेल असा निदेश देईल.

(५) जर वर सांगितल्याप्रमाणे कारण दाखविले गेले असेल किंवा कोणताही आक्षेप घेतला गेला असेल तर, विशेषित न्यायालय त्याच्या तपासणीची कार्यवाही करील, आणि असे करीत असता, पक्षकारांच्या तपासणीसंबंधी आणि इतर सर्व बाबतीत, विशेषित न्यायालय, या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन राहून, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश ३७ खालील वादाच्या सुनावणीच्या बाबतीतील न्यायालयाच्या संक्षिप्त कार्यपद्धतीचे अनुसरण करील आणि वादाच्या सुनावणीच्या वेळी उक्त संहिते अन्वये न्यायालयाचे सर्व अधिकार वापरील आणि आक्षेप घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला जप्तीच्या दिवशी, जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये त्याचा हितसंबंध होता हे दाखवून देण्यासाठी पुरावा सादर करण्यास फर्मावण्यात येईल. १९०८ चा ५.

(६) पोट-कलम (५) खालील तपासणीनंतर विशेषित न्यायालय, एकतर कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये दिलेला जप्तीचा आदेश कायम करणारा किंवा जप्तीमधून मालमत्तेचा काही भाग मुक्त करण्यासाठी आदेशात बदल करणारा किंवा जप्तीचा आदेश रद्द करणारा आदेश काढील:

परंतु, विशेषित न्यायालय, वित्तीय संस्था किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेली व्यक्ती यांचा मालमत्तेत जो कोणताही हितसंबंध असल्याची त्याची खात्री पटली आहे त्या हितसंबंधाची अशा वित्तीय संस्थेच्या ठेवीदारांची परतफेड करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यापेक्षा कमी नसेल इतक्या मूल्याची रक्कम किंवा मालमत्ता जप्तीखाली राहील याचीदेखील खात्री पटल्याशिवाय जप्तीतून सुटका करणार नाही.

असद्भावी हस्तांतरितीची मालमत्ता जप्त करणे.

८. (१) वित्तीय संस्थेच्या किंवा कलम ४ मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या, जप्तीसाठी उपलब्ध असलेल्या मत्ता, अशा वित्तीय संस्थेला ठेवीदारांची परतफेड करण्याकरिता लागणाऱ्या रकमेपेक्षा किंवा मूल्यापेक्षा कमी आहेत असे आढळून येईल त्या बाबतीत, आणि ज्या बाबतीत शपथपत्राद्वारे किंवा अन्यथा, विशेषित न्यायालयाची अशी खात्री झाली असेल की, उक्त वित्तीय संस्थेने कोणतीही मालमत्ता, सद्भावपूर्वक असेल ते खेरीजकरून अन्य प्रकारे आणि मोबदल्यासाठी हस्तांतरित केली आहे (मग ती या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो किंवा नंतर असो) असे समजण्यास वाजवी कारण आहे त्या बाबतीत विशेषित न्यायालय नोटिशीद्वारे, अशा मालमत्तेच्या कोणत्याही हस्तांतरितीला (मग त्याला थेट उक्त वित्तीय संस्थेद्वारे मालमत्ता मिळाली असो अथवा नसो) नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकास न्यायालयापुढे हजर राहावयाला फर्मावू शकेल आणि हस्तांतरितीची जेवढी मालमत्ता हस्तांतरित केलेल्या मालमत्तेच्या उचित मूल्याइतकी असेल तेवढी मालमत्ता जप्त का करण्यात येऊ नये याबद्दल कारणे दाखविण्यास फर्मावू शकेल.

(२) ज्या बाबतीत उक्त हस्तांतरिती विनिर्दिष्ट दिनांकाला हजर राहणार नाही व कारण दाखविणार नाही त्या बाबतीत किंवा ज्यावेळी कलम ७, पोट-कलम (५) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने तपासणी केल्यानंतर, उक्त हस्तांतरितीकडे मालमत्तेचे हस्तांतरण सद्भावपूर्वक केलेले नव्हते व मोबदल्यासाठी केलेले होते याबद्दल विशेषित न्यायालयाची खात्री पटली असेल त्या बाबतीत, विशेषित न्यायालय, त्याच्या मते, उक्त हस्तांतरितीची जेवढी मालमत्ता हस्तांतरित केलेल्या मालमत्तेच्या सममूल्य असेल तेवढी मालमत्ता जप्त करण्याचा आदेश देईल.

९. या अधिनियमान्वये जिची मालमत्ता जप्त करण्यात आलेली आहे अथवा करण्यात येणार आहे अशी कोणतीही वित्तीय संस्था किंवा व्यक्ती यांना, अशा जप्तीऐवजी प्रतिभूती देण्याच्या परवानगीसाठी कोणत्याही वेळी विशेषित न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि ज्या बाबतीत, विशेषित न्यायालयाच्या मते, देऊ केलेली आणि दिलेली प्रतिभूती, समाधानकारक व पुरेशी असेल त्या बाबतीत ते जप्तीचा आदेश रद्द करू शकेल किंवा यथास्थिति, जप्तीचा आदेश देण्यापासून परावृत्त होऊ शकेल. जप्तीऐवजी प्रतिभूती देणे.

१०. या अधिनियमान्वये जप्त केलेल्या व सक्षम प्राधिकाऱ्याकडे निहित असलेल्या मालमत्तेत हितसंबंध असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावर आणि सक्षम प्राधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर विशेषित न्यायालय पुढील गोष्टींसाठी त्याला, न्याय्य आणि वाजवी वाटतील असे आदेश देऊ शकेल :— जप्त केलेल्या मालमत्तेचे व्यवस्थापन.

(क) अर्जदार जीमध्ये हितसंबंध असल्याचा दावा करीत असेल अशा जप्ती आणलेल्या व सक्षम प्राधिकरणाकडे निहित असलेल्या मालमत्तेतून, अर्जदार आणि त्याच्या कुटुंबाच्या निर्वाहासाठी आवश्यक असेल अशा वाजवी रकमेची, आणि कलम ३ अन्वये विशेषित न्यायालयात त्याच्याविरुद्ध फौजदारी कार्यवाही सुरू करण्यात आली असेल त्या बाबतीत अर्जदाराचा बचाव करण्याच्या संबंधात असलेल्या खर्चाची तरतूद करणे;

(ख) जप्तीचा परिणाम झालेल्या कोणत्याही व्यवसायातील हितसंबंधाचे आणि विशेषतः अशा व्यवसायातील कोणत्याही भागीदारांच्या हितसंबंधाचे, व्यवहार्य असेल तेथवर, संरक्षण करणे.

११. विशेषित न्यायालयाच्या आदेशाने व्यथित होणाऱ्या, सक्षम प्राधिकरणासह कोणत्याही व्यक्तीस, आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत उच्च न्यायालयात अपील करता येईल. अपील.

१२. शासनास, विशेषित न्यायालयामधील प्रकरणे चालवण्याच्या प्रयोजनाकरिता, संबंधित जिल्ह्यांचे जिल्हा व सत्र न्यायाधीश किंवा शहर दिवाणी आणि सत्र न्यायालय, बृहन्मुंबई यांचे प्रधान न्यायाधीश, यांच्याशी विचारविनिमय करून, दहा वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी व्यवसाय करत असलेल्या एक किंवा एकापेक्षा अधिक अधिवक्त्यांची, विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून आदेशाद्वारे नेमणूक करता येईल. विशेष सरकारी अभियोक्ता.

१३. (१) आरोपीला न्यायचौकशीसाठी विशेषित न्यायालयाकडे सुपूर्द केले नसतानाही, विशेषित न्यायालय अपराधाची दखल घेऊ शकेल आणि आरोपी व्यक्तीची न्यायचौकशी करताना, 'दंडाधिकाऱ्यांकरवी वॉरंट खटल्यांच्या न्यायचौकशीकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरील. अपराधांच्या बाबतीत विशेषित न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार.
१९७४ चा २.

(२) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदी, विशेषित न्यायालयासमोर चाललेल्या कार्यवाहींस शक्य असेल तेथवर लागू होतील आणि उक्त तरतुदींच्या प्रयोजनाकरिता विशेषित न्यायालय हे दंडाधिकारी असल्याचे मानण्यात येईल.
१९७४ चा २.

१४. या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीजकरून, या अधिनियमाच्या तरतुदी ह्या, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा कोणत्याही रूढीत किंवा कोणत्याही प्रथेत किंवा अशा कोणत्याही कायद्यानुसार परिणामक असलेल्या कोणत्याही संलेखात त्यांच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील. अधिनियम अन्य कायद्यावर अधिभावी ठरणे.

सद्भावपूर्वक केलेल्या कृत्यास संरक्षण.

**१५.** या अधिनियमान्वये सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल शासनाविरुद्ध किंवा सक्षम प्राधिकाऱ्याविरुद्ध किंवा शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**१६.** (१) राज्य शासनाला या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे संमत होतील आणि अशा आशयाचा त्यांचा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, केवळ अशा सुधारलेल्या स्वरूपात अंमलात येईल किंवा यथास्थिति, तो अंमलात येणार नाही; तथापि, असा कोणताही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१७.** या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उपस्थित झाली तर राज्य शासनास प्रसंग उद्भवेल त्यानुसार, ती अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास आवश्यक वाटत असेल आणि या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा आदेश काढता येणार नाही.

सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४ चे निरसन व व्यावृत्ती.

**१८.** (१) महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण (पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९९ चा महा. अध्या. क्र. ३४.

(२) अशा प्रकारे निरसित झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये यथास्थिति करण्यात आलेली कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, पुणे